International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# कृषी पर्यटन केंद्रातील शाश्वत विकास : आपलं गाव ( बेलदरे )

**प्रा. गंगाराम सर्जेराव चव्हाण[१] , डॉ. व्ही. आर. राठोड[२]**

*[1]सहायक प्राध्यापक, भूगोलशास्त्र विभाग,*
*श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय*
*[2]प्राध्यापक व विभागप्रमुख,*
*भूगोलशास्त्र विभाग, वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी, नांदेड.*
***Corresponding Author -** प्रा. गंगाराम सर्जेराव चव्हाण*
**DOI - 10.5281/zenodo.10940801**

**सारांश :**

*आजच्या धावपळीच्या युगामध्ये पर्यटन हा या घटकाला वेगळेच महत्व प्राप्त झाले आहे. कोणत्याही प्रदेशातील ऐतिहासिक वास्तू , किल्ले, धरणे इत्यादी वस्तूंचा उपयोग पर्यटनासाठी होत आहे परंतु ग्रामीण भागातील संस्कृती, निसर्ग, पशुपक्षी शेती, ग्रामीण जीवनशैली शहरी भागातील लोकांना पाहावयास मिळत नाही. धावपळीच्या जीवनातून वेगळेपण तसेच विरंगुळा व मानसिक शांती यासाठी शहरी भागातील लोकसंख्या ग्रामीण भागातील जीवनशैलीकडे पाहू लागली आहे. यातून ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाला कृषी पर्यटन हा पूरक व्यवसाय नावारूपास आला आहे. ग्रामीण जीवनशैली शिक्षण तसेच करमणूक या हेतूतून हे कृषी पर्यटन नावारूपाला येऊ लागले आहे. यातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना पर्यटन व्यवसायाला चालना मिळू लागली आहे. शहरातील वाढती वर्दळ, प्रदूषण मानसिक ताण कमी करणे यासाठी अनेकांनी अनेकांची पावले गावाकडील निसर्ग, ग्रामीण जीवनशैली याकडे वळत आहेत. अलीकडे कृषी क्षेत्रातून कमी उत्पादन भाव मिळत असून शेतीसाठी लागणारा खर्च मात्र वाढत आहे. यातून शेतातून मिळणार मिळत राहणारे उत्पादन कमी होऊ लागले आहे, परिणामी ग्रामीण लोक हे नोकरी हा पर्याय निवडू लागले आहेत. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यामुळे या शेती या व्यवसायातला पूरक व्यवसायाची जोड देणे आवश्यक आहे. शेतीच्या पारंपारिक पूरक व्यवसायाबरोबरच शाश्वत उपाय म्हणून कृषी पर्यटन हा एक पर्याय पुढे आला आहे. शहरी लोकांना जुन्या संस्कृतीची ओळख करून देणे, खेड्यातील शेतकरी वर्गाला उत्पादन मिळवून देणे, रोजगार निर्मिती करणे व आर्थिक स्थैर्य मिळवून देणे हा व्यापक दृष्टिकोन कृषी पर्यटनातून पुढे आला आहे. कृषी पर्यटन हा पर्यटनाचा नवीन चेहरा आहे. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास व ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास या ब्रीदवाक्याला साजेशे कृषी पर्यटन आहे.*

***बीज संज्ञा : ग्रामीण जीवनशैली, शेतकरी वर्ग, कृषी पर्यटन, शाश्वत विकास, सेंद्रिय शेती.***

**प्रस्तावना :**

वाढते औद्योगीकरण, नागरिकरण, लोकसंख्या वाढ इत्यादी गोष्टीमुळे साधनसंपत्तीचा वापर वाढत असून उपलब्ध साधन संपत्तीवर ताण निर्माण होऊ लागला आहे. मानवाच्या अनेक क्रियांचा परिणाम म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास व प्रदूषण आहे. मानवाच्या हस्तक्षेपामुळे अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण होऊ त्याचा परिणाम संपूर्ण सजीवसृष्टीवर होत आहे. कृषी क्षेत्र देखील याला अपवाद नाही. हरितक्रांतीमुळे शेती क्षेत्रामध्ये अमलाग्र बदल झाला. शेतीचे उत्पादन भरमसाठ वाढले. त्यामुळे शेती क्षेत्राला फायदा झाला हे जरी खरे असले तरी त्यातून दीर्घकालीन तोटे होत असल्याचे निदर्शनाला आले आहे. अतिरिक्त जलसिंचन, रासायनिक खतांचा वापर, कीटकनाशकांचा वाढता वापर, तणनाशकांचा वाढता वापर यांच्या अतिवापराने दिवसेंदिवस जमिनीची सुपीकता लोप पावत चालली आहे. परिणामी कृषी उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे दिसते. ही वाढती कृषी समस्या पुढील पिढीसाठी धोक्याची घंटा आहे. अलीकडच्या काळात रासायनिक खते, कीटकनाशके, तननाशकांच्या वाढत्या वापराने मानवी जीवनामध्ये विविध आजारांना आमंत्रण मिळत आहे. उत्पादन तरी वाढले तरी लोकांना त्याचा तोटा झालेला दिसतो.

थोडक्यात कृषी क्षेत्रातील अमुलाग्र बदलांचा दुष्परिणाम हा संपूर्ण सजीवसृष्टीवर परिणामी मानवी जीवनावर जास्त प्रमाणात झाले असे दिसून येते. यातून त्यासाठी शाश्वत कृषी विकास करणे गरजेचे आहे, असे दिसून येते. कृषी पर्यटनातून सेंद्रिय खते, कीटकनाशके, तणनाशके यांचा वापर करून सेंद्रिय कृषी उत्पादन मिळवणे, दूध उत्पादन करणे, शेळी व मेंढीपालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग व मत्स्य व्यवसाय इत्यादी कृषी संलग्न विषयांच्या एकत्रित विचार करून विकास घडवून आणल्यास ग्रामीण भागात कृषी पर्यटनाला निश्चितपणे चालना मिळू शकते. वरील पद्धतीनुसार शाश्वत विकास करण्याचा प्रयत्न सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील बेलदरे या गावात केला आहे. तेथील शाश्वत कृषी विकासाचा अभ्यास प्रस्तुत शोध निबंधामध्ये केला आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

प्रस्तुत शोधनिबंध तयार करताना सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील बेलदरे गावातील "आपलं गाव वनलक्ष्मी कृषी पर्यटन केंद्र" अभ्यास क्षेत्र म्हणून निवडलेले आहे. प्रस्तुत कृषी पर्यटन केंद्र सातारा या ठिकाणापासून 50 किलोमीटर अंतरावर तर कराड या शहरापासून 15 किलोमीटर अंतरावर आहे. या ठिकाणाचे अक्षवृत्तीय स्थान 17.3465 अंश उत्तर व रेखावृत्तीय स्थान 74° 0793 अंश पूर्व असून समुद्रसपाटीपासून या ठिकाणाची सरासरी उंची 614 मीटर / 2014 फूट उंचीवर आहे. कराड तालुक्याच्या पश्चिम बाजूस कराड पाटण मार्गावर हे ठिकाण आढळते. कराड तालुक्याच्या पश्चिमेस हे

कृषी पर्यटन क्षेत्र वसले आहे. "कृषी पर्यटनातून ग्रामविकास" हा मंत्र बाळगून श्री नंदकुमार काटकर संचालक "आपलं गाव वनलक्ष्मी कृषी पर्यटन केंद्र" यांनी आपल्या अथक परिश्रमातून डोंगराच्या पायथ्याला व हिरवळीने नटलेल्या कराड मधील बेलदरे या गावी चार एकर परिसरामध्ये आपलं गाव हे कृषी पर्यटन केंद्र साकारले आहे. कृषी पर्यटन व्यवसायात देखील एक आदर्श उदाहरण आहे,. आपलं गाव हे पर्यटकांच्या मातीशी नाळ जोडत नाही तर पूर्वजांच्या सुंदर आठवणींचा खजिना मिळवून देते. हे कृषी पर्यटन क्षेत्र पर्वत डोंगर उतारावर माळरानावर वसलेले आहे.

**उद्दिष्टे :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये खालील उद्दिष्टांचा अभ्यास केला आहे.

1) आपलं गाव कृषी पर्यटन केंद्रातील शाश्वत कृषी विकासाचा अभ्यास करणे.

2) आपलं गाव पर्यटन केंद्रातील सेंद्रिय शेतीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंध तयार करताना प्राथमिक व द्वितीयक माहितीचा आधार घेतला आहे. आपलं गाव कृषी पर्यटन केंद्राचे संचालक श्री नंदकुमार काटकर सर तसेच या कृषी पर्यटन केंद्रातील काम करणारे कामगार यांच्याकडून माहिती मिळवले असून ती माहिती प्राथमिक स्वरूपाची आहे. द्वितीयक स्वरूपाची माहिती कृषी पर्यटन संबंधित विविध संकेतस्थळे वर्तमानपत्रे, लेख, इंटरनेट यांच्यासाह्याने मिळवलेली आहे.

**विषय विवेचन :**

मानव आपली प्रगती घडवून आणणे व विकास घडवून आणणे यासाठी पर्यावरणातील साधनसंपत्तीचा वापर अमर्याद स्वरूपात करत आहे. हा वापर करत असताना पर्यावरण विकासाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. स्वतःच्या विकासासाठी पर्यावरणात हस्तक्षेप केला आहे. त्यामुळे जमिनीची धूप, प्रदूषण, दुष्काळ, पूर, जागतिक तापमान वाढ, भूमिपात, मृदा ऱ्हास, मृदा नापिकता त्यासारख्या समस्या तयार झाल्या आहेत. वाढती लोकसंख्या व जमिनीचे कमी होणारे प्रमाण यांच्यामध्ये कृषी उत्पादन व वाढलेली लोकसंख्याची अन्नाची गरज यांची सांगड घालणे यासाठी मानवाने कृषी क्षेत्रामध्ये हरित क्रांती घडवली. मानवाने कृषी परिसंस्थेत प्रमाणाच्या बाहेर ढवळाढवळ केली. हरितक्रांतीने वाढत्या लोकसंख्येच्या गरजेनुसार अन्नधान्य उत्पादन वाढविण्यासाठी मानवाने रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके यांचा अमर्याद वापर केला व त्यातून अन्नधान्य उत्पन्न वाढवले व भारत स्वयंपूर्ण बनवला. ही अन्नधान्य वाढ दीर्घकालसाठी झाली नाही मात्र यातून खूपच दुष्परिणाम मानवाला भोगावे लागले. जमिनीची उत्पादकता रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके यामुळे कमी झाली. जमिनीत क्षारपड झाल्या. या पद्धतीने मानवाने जमिनीचा वापर केल्यास पुढच्या पिढीसाठी जमिनीची सुपीकता

राहणार नाही. यासाठी शेतीचा शाश्वत विकास करणे काळाची गरज ठरली आहे. हा विकास घडला तर पुढच्या पिढीसाठी जमिनीतून उत्पादन निघेल, अन्यथा पुढच्या काळात अन्नधान्याची टंचाई व रासायनिक खते कीटकनाशके तणनाशकांच्या अमर्यात वापरातून विविध आजार ही फार मोठी समस्या निर्माण होण्याची संभावना निर्माण झाली आहे.

शाश्वत विकास म्हणजे आजच्या आपल्या गरजा पूर्ण करताना आपण ज्या साधनसंपत्तीचा वापर करतो तो वापर काटकसरीने गरजेपुरता करणे आवश्यक आहे. आज जी साधन संपत्ती आहे उद्याच्या पिढीसाठी गुणवत्तापूर्ण ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी साधनसंपत्तीचे जतन व संवर्धन नियोजन करून व आजच्या आपल्या गरजा भागवणे व विकास करणे होय.

थोडक्यात अशा प्रकारे कृषी पर्यटन करणे ज्यामुळे पर्यावरणावर कोणत्याही दुष्परिणाम होणार नाही व साधनसंपत्तीचा दर्जा ढासळू न देता विकास करणे म्हणजे शाश्वत विकास होय. अशाप्रकारे शाश्वत कृषी विकास सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यामध्ये बेलदरे या गावात चार एकर परिसरात श्री नंदकुमार काटकर सर यांनी केल्याचा प्रयत्न केला आहे. कृषी उत्पादनातून ग्रामविकास करणे हा त्यांचा मंत्र आहे. या ठिकाणी या व्यवसायाच्या निर्मिती मागे सेंद्रिय शेती, सेंद्रिय शेतीचे महत्व, जनावरांच्या विविध प्रजातींचे संवर्धन करणे, सेंद्रिय फळे, कुक्कुटपालन, झाडांचे मानवी जीवनातील महत्त्व, मानवी आरोग्य, ध्यानधारणा, कृषी धार्मिक परंपरा इत्यादी घटकांना केंद्रबिंदू मानले आहे, त्यातून शहरी भागाकडे लोकांना ग्रामीण जीवनमानाचा अनुभव मिळतो या कृषी पर्यटन क्षेत्रामध्ये शेती करत असताना पर्यावरणावरील विपरीत परिणाम होणार नाही. याची काळजी घेण्यात आली आहे. सेंद्रिय शेती हा या मागील प्रमुख हेतू आहे व सेंद्रिय शेतीचा मानवाच्या जीवनावरील चांगला परिणाम कशा पद्धतीने होतो हे दाखवून देणे हा प्रमुख हेतू आहे.

### निर्मिती व विकास :

आपलं गाव या कृषी पर्यटन केंद्राची निर्मिती वृक्षारोपन या छंदातून झाली आहे. काटकर कुटुंबियांची वडिलोपार्जित चार एकर जमिन डोंगर उतारावर व कोरडवाहू स्वरूपाची होती. त्या जमिनीमध्ये 1998 साली झाडे लावण्यास सुरुवात केली. जमीन डोंगराळ भागात व कोरडवाहू असल्याने या ठिकाणी 1998 ते 2013 या कालखंडात ठिबक सिंचनाच्या साह्याने वृक्षलागवड सुरुवात केली. हा भाग पश्चिम महाराष्ट्रात असल्याने कोकण भागात नारळ, आंबा, चिकू, रामफळ, सीताफळ इत्यादी झाडे तसेच इतर शोभिवंत फुलझाडे यांची लागवड मोठ्या प्रमाणात होते. 2013 मध्ये श्री नंदकुमार काटकर यांचे मित्र मंजूद बगदादी या ठिकाणी भेट देण्यासाठी आले. त्यांचा टुरिझमचा व्यवसाय होता.या ठिकाणच्या आजूबाजूस इतर पर्यटन स्थळे, साखर कारखाने, गुऱ्हाळ घरे इत्यादीमुळे हे क्षेत्र कृषी पर्यटन क्षेत्र बनू शकते, हा सल्ला त्यांनी दिला. त्यानंतर 2013 मध्ये

हा झाडे लावण्याचा छंद व्यवसायामध्ये बदलला त्यामधूनच "आपलं गाव "ही कृषी पर्यटन संकल्पना उदयाला आले.

**‘आपलं गाव’ या कृषी पर्यटन केंद्रामधील संकल्पना:**

‘आपलं गाव’ या कृषी पर्यटन केंद्रामधील पर्यटकांसाठी धार्मिक, पर्यावरण संवर्धन, कचरा निर्मूलन मनोरंजन, ग्रामीण परंपरा, इ संदर्भीय अनेक संकल्पना आहेत. या पर्यटन केंद्रामध्ये विठ्ठल रुक्मिणी मंदिर, सेंद्रिय भाजीपाला शेती, देशी गाईंचा गोठा, विविध पक्षीघर, नक्षत्र उद्यान, गांडूळ खत प्रकल्प, कंपोस्ट खत प्रकल्प, झोपड्या, बगीचा, रेनडिस्को, स्विमिंग पूल, बैलगाडीची सफर, पारंपारिक वारली पेंटिंग वरील पर्यावरणपूरक संकल्पना आपलं गाव या कृषी पर्यटन केंद्रामध्ये अनुभवता येतात.

**शेतीतील शाश्वत प्रयोग:**

**जमिनीचे सपाटीकरण:**

आपलं गाव हे कृषी पर्यटन केंद्र डोंगराच्या पायथ्याशी असल्याने मोठ्या प्रमाणावर मृदा धूप होत होती. जनिमीचा उतार शेती करण्यास योग्य नव्हता. त्यामुळे या प्रदेशाची सपाटीकरण करण्यात आले आहे. यामध्ये जमीन शेतीसाठी तयार केली त्यातून मृदाधूप थांबवली आहे. तसेच या ठिकाणी शेतामध्ये दगड, गोटे, माती यांचा उपयोग करून खड्डे बुजवण्यात आले आहेत. उंचवटे कमी करून जमिनीची सपाटीकरण करून जमीन शेतीसाठी योग्य करण्यात आले आहे.

**जलसिंचन:**

हा प्रदेश उंच व डोंगर उतारावर असल्याने पाणी वेगाने वाहून जात होते. तसेच हे कृषी पर्यटन केंद्र कोरडवाहू क्षेत्र असल्याने या ठिकाणी जलसिंचनाच्या सोयी अपुऱ्या होत्या. सुरुवातीच्या कालखंडामध्ये वृक्ष लागवड ही ठिबक सिंचनाच्या साहाय्याने लिंबू ,सीताफळ ,नारळ रामफळ ,आंबा इत्यादी वनस्पती पाणीपुरवठा होत होता .त्यातून पाणी बचत केली जात आहे .ठिबक सिंचनाद्वारे विद्राव्य खते शेतीस पुरवली जातात आणि पाणी वाया जाऊ नये म्हणून झाडांच्या बुंध्याजवळ ठिबक सिंचन दिले आहे त्यातून जलसंवर्धनाचा संदेश या कृषी पर्यटन केंद्रामधून मिळतो.

**सेंद्रिय खते:**

या कृषी पर्यटन केंद्रामध्ये भाजीपाला पिकवण्यासाठी पूर्णपणे सेंद्रिय खतांचा वापर होतो. शेणखत कंपोस्ट खत, गांडूळ खत, लेंडी खत यांचा वापर केला जातो. या केंद्रामध्ये गाई, बैल, म्हशी, मेंढी यांचे पालन होते. याशिवाय बदक, ससे हे प्राणी हे पाळले जात असून त्यांच्या मलमूत्रापासून ही सेंद्रिय खत मिळवली जातात.

**कीटकनाशके :**

आपलं गाव कृषी पर्यटन केंद्रामध्ये पिकावर रोग किंवा कीड पडू नये म्हणून वनस्पती पासून तयार केलेली विविध कीटकनाशके व

जंतुनाशके वापरले जातात तसेच गोमूत्रचा वापर पिकावर फवारणीसाठी होतो. त्यातून निर्जंतुकीकरण केले जाते व मृदेवर त्याचा विपरीत परिणाम होत नाही किंवा मृदेचा ऱ्हास होत नाही.

**सेंद्रिय शेती :**

आपलं गाव कृषी पर्यटन केंद्रामध्ये सेंद्रिय शेतीवरती जास्त भर दिला आहे. सेंद्रिय शेतीतून तयार होणारा भाजीपाला या ठिकाणी पर्यटकांना दिल्या जाणाऱ्या जेवनामध्ये वापरला जातो. सेंद्रिय खते म्हणून गांडूळ खत व कंपोस्ट खत ही खते वापरली जातात. गोमूत्रचा वापर खत व कीटकनाशक म्हणून केला जातो. यातून सेंद्रिय शेतीचे महत्व समजते तसेच या केंद्रामध्ये आढळणाऱ्या सर्व वनस्पती, फुलझाडे यामध्ये सुद्धा सेंद्रिय खतांचाच वापर केला जातो.

**वृक्ष लागवड व वनसंवर्धन :**

पूर्वीच्या कालखंडापासून भारतीय अर्थव्यवस्था शेतीवरती अवलंबून आहे. तसेच आयुर्वेदिक वनस्पतींना सुद्धा पूर्वीपासून खूप महत्त्व आहे. त्यामुळे सेंद्रिय शेती व विविध आयुर्वेदिक झाडे यांची लागवड या ठिकाणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर पारंपरिक शेतीचे महत्व यातून सांगितले जाते. या केंद्रामध्ये आढळणारे नक्षत्र उद्यानातून वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला जातो. प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीमध्ये बारा राशी व सत्तावीस नक्षत्र असून राशीच्या नावावरून झाडाचे महत्व या ठिकाणी तक्त्याच्या स्वरूपामध्ये आढळते. आपल्या राशीच्या नावाने कोणते झाड आहे यातून ते झाड तोडू नये किंवा ते झाड लावावे असा संदेश यातून दिला जातो. थोडक्यात वनसंवर्धन वृक्ष संवर्धन ही संकल्पना सुद्धा या ठिकाणी महत्त्वाची मानली गेली आहे .

**गोपालन :**

भारतीय संस्कृतीमध्ये गाईला गोमाता किंवा देवता मानले जाते. सध्या देशी गाईंच्या प्रजाती नष्ट होत असून या प्रजातींचे संवर्धन या ठिकाणी करण्यात आले आहे. त्यामध्ये गीर, सइवाल, धारवाल खिलार, देवगी इत्यादी प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत तर त्या गायीचे संवर्धन या ठिकाणी केले जाते. तसेच यापासून तयार मिळणारे देशी गायीचे दुग्धजन्य पदार्थ यामध्ये तूप, दही, लोणी ताक इत्यादी घटक या ठिकाणी मिळवले जातात तर त्या घटकांचा वापर या ठिकाणी पर्यटकांना दिल्या जाणाऱ्या जेवणामध्ये केला जातो. गाईपासून मिळणाऱ्या विविध घटकातून जीवामृत व गोआमृत इत्यादी घटक ही या ठिकाणी मिळवले जातात.

**कचरा निर्मूलन :**

नैसर्गिक शेती, पर्यावरण संरक्षण व पुनर्चक्रीकरण या प्रमुख घटकांच्या आधारे या ठिकाणी कृषी पर्यटन केले जाते. गांडूळ खत कंपोस्ट खत ही खते या कृषी पर्यटन केंद्रात तयार केली जातात. यातून कचरा निर्मूलन केलेले पाहायला मिळते.

**इतर धार्मिक व मनोरंजनाचे घटक :**

विठ्ठल रुक्मिणी मंदिर या ठिकाणी आहे. त्यातून धार्मिक परंपरा जपली आहे. त्याबरोबर भजन कीर्तन या धार्मिक गोष्टी या ठिकाणी पहावयास मिळतात, तसेच पक्षांच्या विविध प्रजाती व त्यांचे संवर्धन ही या ठिकाणी केले गेले आहे, गांडूळ खत कंपोस्ट खत कसे तयार केले जाते. त्याचा मानवी जीवनामध्ये कसा उपयोग केला जातो तसेच शेतीमध्ये कसा उपयोग केला जातो याची प्रात्यक्षिके या ठिकाणी दाखवली जातात. झोपड्यांची बांधकामे करून ते बांधकाम बांबूपासून केले आहे व त्यातून शहरी लोकांना ग्रामीण घरांचा एक अनुभव या ठिकाणी मिळतो. तसेच इतर पारंपारिक खेळ या ठिकाणी खेळले जातात व पारंपारिक खेळाचे अनुभव या ठिकाणी मिळतात.या कृषी पर्यटन केंद्रातील बगीचामध्ये विविध वृक्ष फुलझाडे असल्याने हिरवळीने नटलेला प्रदेश पाहावयास मिळतो. वारली पेंटिंग ही या ठिकाणी असलेले पाहायला मिळते. स्विमिंग टँक, रेनडिस्को यातून पर्यटकांना पोहण्याचा आनंद व पाण्यात खेळण्याचा आनंद मिळतो. आंब्याच्या विविध जातीचे कलम ही या ठिकाणी केले जाते. ते कलम विकण्यास या ठिकाणी ठेवले आहे.

वरील सर्व घटक आपलं गाव या कृषी पर्यटन क्षेत्रांमध्ये येतात. त्यामध्ये नैसर्गिक शेती, पर्यावरण संरक्षण व पुनर्चक्रीकरण या घटकांवर प्रामुख्याने जास्त भर दिलेला पाहायला मिळतो. कृषी पर्यटन केंद्रामुळे आजूबाजूच्या भागातील जवळपास 100 लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. सन 2018 -2019 साली सातारा जिल्हा परिषद यांचेकडून या कृषी पर्यटन केंद्राला रोजगार निर्मितीमुळे पहिला क्रमांक मिळालेला आहे. वरीलप्रमाणे आपलं गाव एक कृषी पर्यटक केंद्र पर्यटकांसाठी मनोरंजन नव्हे तर पर्यावरणीय संदेश देत आहे किंबहुना पर्यावरण संवर्धनाचा व सेंद्रिय शेतीचा वारसा चालवत आहे. कचरा निर्मूलन, गोशाळा तसेच वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन संरक्षण, झाडांचे मानवी जीवनातील महत्त्व इत्यादी घटकांना तसेच सेंद्रिय खतांचे, कीटकनाशकांची मानवी जीवनामध्ये होणारा परिणाम या सर्व घटकांवरती दृष्टीक्षेप टाकून या कृषी पर्यटन केंद्राची निर्मिती करण्यात आलेली आहे.

**निष्कर्ष :**

1) आपलं गाव कृषी पर्यटन केंद्रामध्ये शेती सेंद्रिय पद्धतीने केली जात असल्यामुळे उत्पादन गुणवत्तेचा दर्जा सुधारलेला आहे.
2) सेंद्रिय शेती पद्धतीतून तयार होणाऱ्या कृषी मालाला बाजारपेठेमध्ये मोठी मागणी आहे .
3) सेंद्रिय शेतीतून तयार होणाऱ्या कृषीमालाचा सजीवांच्या आरोग्यावरती विपरीत परिणाम होत नाही.
4) केंद्रातील शाश्वत विकास इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन ठरत आहे .
5) सेंद्रिय खते यामुळे जमिनीची सुटका सुधारते.

6) जमिनीची सपाटीकरण झाल्यामुळे मृदेची धूप कमी झालेली पाहावयास मिळते.
7) वरील क्षेत्रामध्ये कृषी विकास करत असताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे.
8) कृषी पर्यटन केंद्र मध्ये धार्मिक गोष्टींबरोबरच वृक्ष संवर्धनाचा ही संदेश दिलेला आहे .
9) सेंद्रिय शेतीमध्ये मानवाच्या जीवनातील महत्त्व या ठिकाणी समजते.
10) नैसर्गिक शेती, पर्यावरण संरक्षण व पुनर्चकरीकरण हा संदेश या पर्यटन केंद्रातून लोकांना मिळतो.

**संदर्भसूची :**


1. कृषी भूगोल - विजया साळुंखे
2. पर्यटन भूगोल - सूर्यवंशी एस पी
3. टुरिझम पॉलिसी ऑफ महाराष्ट्र -2006
4. महाराष्ट्र कृषी पर्यटन विस्तार योजना – 2006
5. प्रत्यक्ष मुलाखत
6. www.agrotorism.com
7. www.google.com